महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग,
धोबी तलाव, मुंबई-४००००१

ईमेल: ceo@mssds.in दुरध्वनी क्र. ८६५५८१६२४०/४१

जा. क्र. मराकौविसो/आचाकौविकें/२०२४-२५/ 17 दि. ०१/०१/२०२४

प्रति,
**प्रशिक्षण प्रदाते (TP)**
आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र- ACKVK (सर्व).

**विषय** :- "AEBAS IRIS-based" हजेरी प्रणाली अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ** :-NIC (National Information Center) भारत सरकार यांचा दि. १८.११.२०२४ रोजीचा AEBAS IRIS-based बाबत ई-मेल.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी, तसेच, युवक- युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK)" ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. या अंतर्गत राज्यभरात ३६ जिल्ह्यातील ११२४ विविध महाविद्यालयांमधून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रे (ACKVK) स्थापन केली आहेत. या केंद्राचे उद्घाटन मा. पंतप्रधान यांच्या शुभ हस्ते दि.२०/०९/२०२४ रोजी झाले आहे.

२. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या (ACKVK) ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी म.रा.कौ.वि.सो मार्फत वारंवार पत्रव्यवहार, व्ही. सी द्वारे मार्गदर्शक सूचना,शंकाचे निराकरण करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने Thumb based-AEBAS Devices या हजेरी प्रणालीवर प्रशिक्षणार्थी यांची नोंदणी करून त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असल्याचे कळविण्यात आले होते.

३. उमेदवारांची ऑनलाईन हजेरी ही प्रशिक्षण संस्थांना मिळणाऱ्या प्रतिपूर्तीसोबत संलग्न असल्याने वरील डिव्हायसेस बाबतीतील काही समस्या विचारात घेवून उक्त संदर्भानुसार NIC (National Information Center) भारत सरकार यांनी उमेदवारांची हजेरी प्रणाली ही Thumb based-AEBAS (Adhar Enabled Biometric Attendance System) Devices ऐवजी IRIS based- AEBAS Devices हजेरी प्रणालीवर घेण्याची शिफारस केली आहे.

४. NIC (National Information Center) भारत सरकार यांनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सर्व "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK)" यांना खालील प्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

कृ.मा.प. २/-

a) सर्व प्रशिक्षण केंद्रांवर सध्या उमेदवारांच्या हजेरी नोंदविण्यासाठी वापरत असलेल्या Thumb Based-AEBAS या प्रणाली ऐवजी NIC/UIDAI कडून मान्यताप्राप्त असलेल्या IRIS based-AEBAS हजेरी प्रणालीचा वापर करण्याचे बंधनकारक (Mandatory) करण्यात येत आहे.

b) सर्व प्रशिक्षण केंद्रांनी या सोबत देण्यात येत आलेल्या IRIS based-AEBAS Devices ची आपल्या केंद्रामध्ये विहित पध्दतीने स्थापित करण्याची दक्षता घ्यावी.

c) प्रशिक्षण केंद्रांनी आपल्या केंद्रामध्ये आजनंतर (दि. ०२.०१.२०२५) सुरू करावयाच्या बॅचेसकरीता प्रवेशित उमेदवारांची हजेरी NIC/UIDAI मान्यताप्राप्त IRIS based-AEBAS हजेरी प्रणालीवरच घेण्याची कार्यवाही करावी.

d) प्रशिक्षण केंद्रांनी आपल्या केंद्रामध्ये आजपुर्वी (दि. ०२.०१.२०२५ ) सुरू केलेल्या बॅचेसकरीता प्रवेशित उमेदवारांची Thumb based-AEBAS द्वारे त्वरीत (जास्तीत-जास्त दिनांक ३१ जानेवारी २०२५ पर्यंत) हजेरी घेणे बंद करून, NIC/UIDAI मान्यताप्राप्त IRIS based-AEBAS प्रणालीवरच हजेरी घेण्याची कार्यवाही करावी.

e) IRIS based-AEBAS हजेरी प्रणालीबाबत देण्यात आलेल्या वरील विहित मुदतीनंतर सध्यस्थितीमध्ये चालू असलेली Thumb Based AEBAS हजेरी प्रणाली ही NIC मार्फत दि. ०१.०२.२०२५ पासून बंद करण्यात येईल.

f) वरील बाबींची सर्व "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK)" यांचे प्रशिक्षण प्रदाते (TP) यांनी नोंद घ्यावी आणि सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. या प्रमाणे कार्यवाही न झाल्यास होणा-या परिणामांची जबाबदारी संबंधित प्रशिक्षण प्रदाते (TP) यांची राहील.

**सोबत:** मान्यताप्राप्त IRIS Based-AEBAS Devices तपशील (Specifications of the approved IRIS-based devices)

(प्रदीपकुमार डांगे, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

**प्रत उचित कार्यवाहीस्तव :-**

१. मा. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई
२. उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय (सर्व विभाग)
३. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (सर्व जिल्हे).

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रशिक्षण आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) यांच्याकडे IRIS Based--AEBAS हजेरी प्रणालीचे Devices विहित मुदतीत स्थापित होतील याबाबत कटाक्षाने लक्ष द्यावे व पाठपुरावा करावा.